www.mpboardonline.com

कुल प्रश्नों की संख्या : 25 | कुल पृष्ठों की संख्या : 08

Total No. of Questions: 25 | Total No. of Pages: 08

# हाई स्कूल परीक्षा, जून – 2018

# 502

## विषय : मराठी (सामान्य)

**Subject: MARATHI (Special)**

समय : 03 तास | एकुण गुण : 100

Time: 03 Hours | Maximum Marks: 100

---

*निर्देश –*

*सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.*

प्र.1 रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा– **(5)**

(1) बाबाजीचे आजचे भजन अगदी.........................................होते.

(अपूर्व, अपूर्ण)

(2) टिळकांनी तुरूगांत.....................................हा अमोल ग्रंथ लिहला.

(गीतांजली, गीतारहस्य)

(3) खाडंववनात...........................................................वस्ती होती.

(नागांची, गंर्धवांची)

(4) झाले............................................उदार आल्या पागोळया अंगणी।

(आभाळ, छप्पर)

(5) कितीतरी दिवसात नाही...................................................डुबलो.

(पाण्यात, नदीत)

प्र.2 योग्य जोडया बनवा– (5)

| | |
|---|---|
| (1) शिक्का | (i) सुधाकर भालेराव |
| (2) माझा छंद–आकाश दर्शन | (ii) बा. सी. मर्ढेकर |
| (3) हिवाळा | (iii) नारायण मुरलीधर गुप्ते |
| (4) कितीतरी दिवसात | (iv) ना. स. इनामदार |
| (5) माझी कन्या | (v) अनिल |
| | (vi) म. भा. भोसले |
| | (vii) वि. वा. शिखाडकर |

प्र.3 सत्य/असत्य लिहा. (5)

(1) पांगारकर हे पंढरपुर हायस्कुलात शिक्षक होते.

(2) बळीला पाहण्यासाठी दौलतेच मन अधीर झाले होते.

(3) आंबेडकराच्या वडिलांना इग्रंजीचा नाद होता.

(4) सावरकराना जन्मठेपेची शिक्षा झाली होती.

(5) नका देऊ हो मला देवपण असे टिंळक म्हणतात.

प्र.4 एका वाक्यात/शब्दात उत्तरे लिहा– (5)

(1) कवितेत पावसाचे वर्णन कोणत्या नक्षत्रातील आहे?

(2) शिशिर ऋतूत कुणाला हुडहुकी भरते?

(3) आधार देउन सिद्ध केलेले–(या साठी एक शब्द लिहा)

(4) आकाशातील ग्रहगोलांचा व्यवस्थित अभ्यास (एक शब्द लिहा)

(5) राम शाळेत जातो (नाम ओळखा )

प्र.5 वाक्प्रचाराचा अर्थ लिहा– (5)

(1) हातभार लावणे

(2) कामाला येणे

(3) गगनात न मावणे

(4) श्रीगणेश करणे

(5) तोंड देणे

अतिलघुउत्तरीय प्रश्न.

प्र.6 मातीच्या सुगंधाचा खोंडावर कोणता परिणाम झाला? (2)

किंवा

कवीनुसार रत्न सोने कुठे जन्म घेतात व त्यांची महत्ता काय?

प्र.7 'कितीतरी दिवसात' या कवितेतील कवी त्यांना आवडणाऱ्या गोष्टींचा आस्वाद कां घेऊ शकत नाही? (2)

किंवा

सर्व सृष्टीवर घडून आलेले परिणाम सांगणारा एक अर्थपूर्ण शब्द कवितेत आहे? तो शब्द कोणता?

प्र.8 वैद्यराजांनी पांगारकरांची कोणती परीक्षा घेतली? (2)

किंवा

फागू कोण होता? तो कसा मारला गेला?

प्र.9 टिळकांनी कोणते व्रत घेतले? (2)

किंवा

तात्यांनी दौलतला लगेच घर सोडण्यास कां सांगितले?

प्र.10 काळाच्या कोणत्याही दोन प्रकारांची नावे लिहा. (2)

**किंवा**

खालील वाक्यातील काळ ओळखा.

(1) ते देउळ सुदंर होते.

(2) राम पुढच्यावर्षी शहरात शिकायला जाईल.

प्र.11 खालिल वाक्यातील क्रियापदे ओळखा. (2)

(1) तो टपोरे थेंब झेलतो.

(2) छप्परे उदार झाली.

**किंवा**

पुढील शब्दांचे भिन्न अर्थ लिहा.

(1) अंबर

(2) पय

प्र.12 खालील शब्द शुद्ध करा. (2)

(1) आयुश्य,

(2) दुरगम

**किंवा**

खालील शब्दांपैकी शुद्ध शब्द निवडून लिहा.

(1) अनुभव, अणुभव, अनूभव.

(2) प्रतीष्ठा, प्रतीष्टा, प्रतिष्ठा

प्र.13 विरूद्धार्थक शब्द लिहा. (2)

(1) स्वतंत्र

(2) चढवणे

<u>किंवा</u>

समानार्थक शब्द लिहा.

(1) भुजंग

(2) तरु

लघुउत्तरीय प्रश्न.

प्र.14 पाठ्य पुस्तकातील कोणत्याही एका सतांच्या अभंगाचा अर्थ लिहा. (4)

<u>किंवा</u>

'वर्तल्याविन बोलावे ते शब्द मिथ्या' असे रामदासस्वामी का म्हणतात?

प्र.15 आपले निशाण कशाकशांचे प्रतीक आहे? (4)

<u>किंवा</u>

मुलींची समजूत काढण्यासाठी कवीने काय केले?

प्र.16 धुगरी गावात व इतर गावात कोणता फरक होता? (4)

<u>किंवा</u>

पिता म्हणून टिळकांनी कोणती जबाबदारी पार पाडली?

प्र.17 पोळयाच्या दिवशी बैलांना गाडीला कां जुंपत नाहीत? (4)

<u>किंवा</u>

अर्जुनवृक्षाने कृष्णार्जुनाला कोणता शाप दिला?

www.mpboardonline.com

प्र.18 डॉ. आंबेडकरांच्या मनात भक्तिभाव कसा निर्माण झाला? (4)

किंवा

ज्ञानेश्वराबद्दल आंपणाला आदर व अभिमान का वाटतो?

प्र.19 पुढील शब्दातील उपसर्ग व प्रत्यय वेघळे करून मूळ शब्द लिहा. (4)

(1) मासिक

(2) प्रयत्न

(3) शत्रुत्व

(4) मर्यादित

किंवा

समास म्हणजे काय? व्याख्या लिहून प्रकारांची नावे लिहा.

प्र.20 संदर्भ सहित पद्याचा अर्थ लिहा (5)

देव देतो सद्‌गुणी बालकांना

काय म्हणुनी आम्हास करट्यांना?

किंवा

सृष्टीला भरले हीव, थरथरे अंग

लोपले धुक्यातच सर्व उषेचे रंग

प्र.21 जीवन परिचय लिहा. (5)

(1) नारायण मुरलीधर गुप्ते

किंवा

(2) बा.सी.मर्ढेकर

प्र.22 संदर्भ सहित गद्याचा अर्थ लिहा. (5)

"रामाप्रमाणे चौदा वर्ष वनवास भोगलात, धन्य आहे?"

<u>किंवा</u>

खरी कारभारीण तूच शोभतेस.

प्र.23 सहलीला जाण्यासाठी परवानगी मागणारे पत्र वडिलांना लिहा. (5)

<u>किंवा</u>

परीक्षा जवळ आल्या आहेत तेव्हां लाउडस्पीकर मोठ्याने न लावण्याचे आदेश काढण्याबाबत पोलिस विभागाला पत्राने कळवा.

प्र.24 खालील उतारा वाचून त्याखाली लिहलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (5)

पूर्वीच्या काळी गुरूगृही राहून गुरूची सेवा केल्यानंतर प्रसन्न होउन गुरू आपली विद्या शिष्यांना अर्पण करायचे. आजदेखील एकलव्याच्या निष्ठेने ग्रंथगुरुची सेवा केली म्हणजे आपल्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारतात, श्रीमंत होण्याचा मार्ग ग्रंथातून कधीच जात नाही, पण मनाची श्रीमंती ग्रथांच्या वाचनाने वाढते. खुरटेपणा, अज्ञान कमी होते, आणि ज्ञानाचे एक क्षितिज आपल्या दृष्टीपथात येते.

आज दुरदर्शन या माध्यमामुके अनेक प्रकारची माहिती आपल्याला मिळते. पण वाचनाअभावी आमची मने फुलत नाहीत. ग्रथांच्या पवित्र पायांना स्पर्श करून आपण जेव्हां त्यांच्या अंतःकरणाला स्पर्श करतो तेव्हां पानापानातून ग्रंथ उलगडले जातात आणि आपले अंतःकरण उघडे करून ते आपल्याशी सुसंवाद करतात. त्यांच्याशी तुम्हीं जितकी अधिक सलगी कराल तितकी ज्ञानांची कवाडे ते अधिक खुली करतील.

**प्रश्न–**

(1) पुर्वीच्या काळी गुरू शिष्यांना विद्या कशी अर्पण करायचे?

(2) आपल्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारण्यासाठी काय करावे?

(3) ग्रंथ आपल्याशी केंव्हा ससुंवाद करतात?

(4) ग्रंथ ज्ञानाची कवाडे केंव्हा खुली करतील?

(5) उताऱ्याला शीर्षक लिहा.

www.mpboardonline.com

प्र.25 खलील पैकी एका विषयावर निबन्ध लिहा– (10)

(1) माझा छंद

(2) माझा आवडता ऋतु

(3) प्रदूषण–एक समस्या

(4) शाळेची सहल

(5) माझा आवडता पुढारी

-------------------------------